**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५८५

निर्णय दिनांक ०५-०९-२००८

१ श्री. दामोधर भिकाजी मदन, : अपिलार्थी
रा. केळीगव्हाण, तालुका बदनापूर,
जिल्हा जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, जालना,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, औरंगाबाद
पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०९-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दामोधर भिकाजी मदन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सत्तारखान जमालखान, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. आबासाहेब दादासाहेब कोकाटे, जन अपिलीय

अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २५-०५-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, त्यांनी मागणी केलेली माहिती न देता दुसरीच दिशाभूल करणारी माहिती दिली, तसेच १०० रुपयाच्या बॉण्डवर त्यांची या प्रकरणी काही तक्रार नसल्याचे खोटे लिहून घेतले व या बॉण्डपत्रावरील सही त्यांची नाही असे नमूद केले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये दिलेल्या उर्वरित मजकुरावरुन स्पष्ट असा कोणताही बोध होत नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या वर्णनासमोर त्यांनी दिनांक ०९-१०-२००६ रोजी अर्ज दिलेला आहे त्याची झेरॉक्स प्रत सोबत जोडत आहे, असे म्हटले आहे, तथापि यासोबत त्यांचा दिनांक ०९-१०-२००६ रोजीचा अर्ज नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या या दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले, तथापि या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही.

वरील कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे, या टप्प्यावर अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००७ रोजीच्या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमातील कलम १९ (३) प्रमाणे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००७ रोजीच्या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन, या संदर्भातील आपले आदेश तदनंतर ७ दिवसाच्या आत पारित करावेत.

औरंगाबाद
दिनांक ०५-०९-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दामोधर भिकाजी मदन, रा. केळीगव्हाण, तालुका बदनापूर, जिल्हा

जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.